**निर्णय क्र.३७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. व्यवस्थापन समिती चे दि.२४/०२/२०२२ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.७१ अन्वये श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता एक नग नविन Fully Automated Immunoassay System विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६७,०५,३५०/-चे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. परंतु मे. महिन्द्रा फाउंडेशन, मुंबई यांचेकडून ०१ नग Fully Automated Immunoassay System देणगी स्वरुपात प्राप्त झालेले असून Installation देखील झालेले आहे. त्यामुळे मा. व्यवस्थापन समिती चे दि.२४/०२/२०२२ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.७१ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा हॉस्पिटल मधील १५३ नग मशिनचे व श्री साईनाथ रुग्णालयाचे ११० नग विविध मशिनचे २०२२-२०२३ करीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रस्तावात नमुद मशिन्सचे स्पेअर पार्टस हे Monopoly या प्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही. म्हणुन सदरच्या मशिनचे LMC,CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्स करीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हीस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअर पार्टस बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमे पेक्षा अधिक असेल. सध्याचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दि. ३०/०६/२०२२ रोजी संपत असुन पुढील वर्षाकरीता आर्थिक वर्षाप्रमाणे दि.०१/०७/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ या कालावधीकरीता सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केल्यास पुढील वर्षाचे आर्थिक वर्षाप्रमाणे म्हणजेच दि. ०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ या प्रमाणे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे शक्य होईल.**

**त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण १५३ नग मशीन्सचे संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांनुसार येणा-या एकुण रू.४९,६६,७३८/- तसेच श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण ११० नग मशिन्सचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांनुसार येणा-या एकुण रू.३२,१५,१११/- इतक्या रकमेच्या येणा-या प्रत्यक्ष खर्चास व सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२०** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१३,१८,५४८/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील नमुद २४ कर्मचाऱ्यांना (रुग्ण २५) देय असलेली रक्कम रु.१३,१८,५४८/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२१** **दि.०१ एप्रिल २०२१ ते दि.३१ मार्च २०२२ अखेर / कालावधीत वाटप करणेत आलेली अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत दि.०१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे देण्यात आलेल्या २१७ रुग्णांसाठी रक्कम रु.१,००,२३,३८६/-मात्र वैद्यकीय आर्थिक अनुदान रकमेची तसेच परत आलेल्या ६१ रुग्णांची रक्कम रु.१४,९५,२७९/-मात्र रकमेचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम व प्रत्यक्षात वाटप होणारी रक्कम यामध्ये मोठया प्रमाणात तफावत दिसुन येते याकरीता जास्तीत जास्त रुग्णांना या योजनेचा लाभ घेता येईल याकरीता उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच रुग्णांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर वैद्यकीय आर्थिक अनुदानाची रक्कम लवकरात लवकर संबधीत रुग्णालयात पोहच होईल यासाठी नियोजन करण्यात यावे, अशा सुचना यावेळी करण्यात आल्या.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२२** **संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०२३ (दि.०१ जानेवारी, २०२३ ते दि.३१ डिसेंबर,२०२३) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित करुन, साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील परिच्छेद ब मध्ये नमूद केलेल्या अ.नं.१ ते ६ बाबींस अनुसरुन, छपाईसाठी प्रस्तावित करणेत आलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिका यांचे गत वर्षाची विक्री, खप व त्यास मिळणारा प्रतिसाद या बाबी विचारात घेऊन, सन २०२३ करीता दैनंदिनी व दिनदर्शिका साहित्य छपाईचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीस व त्याकामी येणारे अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सन २०२३ करीता दैनंदिनी इतर भाषेत छपाई न करता फक्त मराठी व इंग्रजी या ०२ भाषेत एकत्रित छपाई करण्यात यावी,अशी सुचना करण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२३** **संस्थानला देणगीस्वरुपात प्राप्त होणारे मौल्यवान खडे (Precious Stone) तसेच खडयांसहित सोने-चांदी वस्तु अलंकारांच्या मूल्यांकनकारांच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.३७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१-२०२२ या कालावधीत संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या खडयांचे मुल्यांकन करण्यासाठी श्री.प्रदिपकुमार झवेरी, मुंबई व नरेश एन.मेहता तसेच सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई या मुल्यांकनकारांची प्रति खडा रुपये ७५/-+जीएसटी या मानधनावर तसेच पूर्वीच्याच अटी-शर्तीवर त्यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.२४** दि.२६/०३/२०२२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.१५८ मध्ये दुरुस्ती करणेबाबत.

**निर्णय क्र.३७६** यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२६.०३.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५८ मध्ये लिलाव योग्य वस्तुंची छाननी करणेसाठी असा समावेश करुन त्यानुसार दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.

आयत्या वेळेचा
**विषय नं.०१** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२२-२३ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्याचे दर निश्चीती करणे (Rate Contract) तसेच On Consignment Basis वरील Material खरेदी कामी येणा-या अंदाजित रक्कम रु.५१,८९,४३,७९१/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३७७** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२२-२३ या वर्षाकरीता लागणारे औषधे/सर्जिकल साहित्य/On Consignment basis वरील साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजित नगसंख्येप्रमाणे खरेदी न करता पुरवठाधारकांशी निम्नतम दराने दरनिश्चिती (Rate contract) करुन संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात औषधे/ सर्जिकल साहित्य इत्यादी मागणीप्रमाणे खरेदी करुन उपलब्ध ठेवता येईल. यासाठी ई-निविदा / कोटेशनमध्ये घेणेत आलेली नगसंख्या संपल्यास संस्थान प्रशासनाचे मान्यतेने आवश्यकतेनुसार नगसंख्या वाढवून खरेदी करता येईल, जेणेकरुन औषधांचा तुटवडा न भासता रुग्णांना यथायोग्य आरोग्य सेवा पुरविता येईल. याकरीता उपरोक्त प्रस्तावात नमुद मटेरीयल खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर प्राप्त होणेच्या दृष्टीने तसेच ठराविक पार्टसाठी वेगवेगळया कालावधीत शासन नियमावलीनुसार विहीत पध्दतीने ई-निविदा / कोटेशन मागवून खरेदी प्रकिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजित एकुण रक्कम रु.५१,८९,४३,७९१/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
**विषय नं.०२** सन २०२२-२३ या कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने निम्नतम दरधारकाकडुन करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत माहीतीस्तव सादर करणे.

**निर्णय क्र.३७८** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य / सामुग्रीसहचे काम आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी अंदाजित खर्च रु. ३,७०,००,०००/- प्रस्तावित केला होता. परंतु वाणिज्य बीड (Commercial Bid) मध्ये अंदाजित किंमती पेक्षा २१.५% इतके कमी दर दिलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तकेतील ३.१.२.१ नुसार खरेदीची वास्तविक किंमत व अंदाजित किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करणेस खरेदीदारास विचार करता येईल असे नमुद आहे. संबंधित कंपनीने दिलेले दर हे अंदाजित किंमती पेक्षा २१.५% इतके कमी आहे. म्हणजेच खरेदी नियमावली पेक्षा फक्त (-) १.५ % इतकी तफावत असुन ती किरकोळ आहे त्यात श्री साईबाबा संस्थानचा आर्थिक फायदा होणार आहे.

तसेच पुन्हा नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यामध्ये श्री साईबाबा संस्थानचा वेळ व आर्थिक नुकसान होईल त्याकरीता सध्या राबविलेली ई–निविदा प्रक्रिया पुर्ण करुन संबधित कंपनीस कार्यादेश दिल्यास संस्थानचा वेळ व पैसा या दोघांची बचत होऊन दैनंदिन कामकाज व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने योग्य राहील.

सदर कंपनीने श्री साईबाबा संस्थान मधील इतर विभागामध्ये देखील यापुर्वी आउटसोर्स पध्दतीने स्वच्छता हाउसकिंपींगचे कामे केलेली/करीत आहे. तसेच सध्या संस्थान रुग्णालये विभागाचे स्वच्छता हाउसकिंपींगचे कामे करीत असलेल्या ठेकेदाराची कार्यादेशाची मुदत ३०/०४/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असुन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सदर कंपनीस दोन महिने मुदत वाढ देण्यात आलेली आहे. मुदतवाढ दि.३०/०६/२०२२ रोजी संपुष्टात येत आहे. कंपनीने पुन्हा मुदत वाढ घेणेस नकार दिल्यास दैंनदिन कामकाजात अडचण निर्माण होऊ शकते. संस्थानचे दोन्ही रूग्णालयातील स्वच्छताची कामे ही दैनंदिन कामे असुन रूग्णालयामध्ये दाखल झालेल्या रूग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने रूग्णालयातील वार्ड व परिसराची स्वच्छता होणे अत्यंत महत्वाचे आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन, सन २०२२-२३ या कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेतील निम्नतम दरधारक यांचे रक्कम रु.३,४२,७०,८५४.५५ मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१५,९४,११३/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७९** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील नमुद २३ कर्मचाऱ्यांना (रुग्ण २४) देय असलेली रक्कम रु.१५,९४,११३/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता एक नग Blood Cell Separator ई-निविदा मागवून खरेदी व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५४,२२,७२६/- चे खर्चाचा प्रस्ताव निरस्त करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८०** यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०१.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०३ अन्वये श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता एक नग Blood Cell Separator ई-निविदा मागवून खरेदी व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५४,२२,७२६/- चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सदरचे मशिन महिंद्रा फाऊंडेशन यांचेकडून देणगी स्वरुपात प्राप्त झालेले असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०१.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०३ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०५ आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती कामी पात्र लेखापरिक्षण संस्थांपैकी तीन लेखापरिक्षण संस्थांची नांवे अंतिमत: निवडीकरिता शासनाकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती कामी पात्र लेखापरिक्षण संस्थांपैकी तीन लेखापरिक्षण संस्थांची नांवे मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अंतिम करुन निवडीकरिता शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी दि.३०.०६.२०२२ अखेर शासनाकडे अहवाल सादर करणे आवश्यक आहे, याची पुर्व कल्पना असुनही सदरचा विषय आयत्या वेळेचा विषय म्हणून समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, विभागाकडून विषय तयार करतांना त्यामध्ये अनेक त्रुटी असल्याचे आढळून येत होते. याबाबत वारंवार सुचना करुनही त्याचे पालन झालेले नाही. त्यामुळे सदरचा विषय आयत्या वेळी घेण्यात आला.

याबाबत श्री.लंके, प्र.लेखाधिकारी यांचेवर समितीने तीव्र नाराजी व्यक्त करुन त्यांचेवर कडक प्रशासकीय कारवाई करावी, असे निर्देश दिले.

(कार्यवाही-लेखाशाखा सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०६ आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती कामी पात्र लेखापरिक्षण संस्थांपैकी ३ लेखापरिक्षण संस्थांची नांवे अंतिमत: निवडीकरिता शासनाकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती कामी पात्र लेखापरिक्षण संस्थांपैकी तीन लेखापरिक्षण संस्थांची नांवे मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अंतिम करुन निवडीकरिता शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०७ पुर्व लेखापरिक्षक (Pre-Auditor) नेमणूक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.

निर्णय क्र.३८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, पुर्व लेखापरिक्षक (Pre-Auditor) नेमणूक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांपैकी एका लेखापरिक्षण संस्थेची नेमणूक करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०८ आयकर (TDS) विषयक संपुर्ण कामकाजाकरिता आयकर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फी चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.

निर्णय क्र.३८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर (TDS) विषयक संपुर्ण कामकाजाकरिता आयकर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांपैकी एका लेखापरिक्षण संस्थेची नेमणूक करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०९ **श्री साईसच्चरित पारायण सोहळा वर्षे २८ वे नेहमीचे प्रथा आणि परंपरेप्रमाणे साजरा करणेबाबत.**

निर्णय क्र.३८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण मासातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा साई आश्रम येथील समाधी मंडप याठिकाणी घेण्यास तसेच श्री साईसच्चरित पारायण सोहळयास व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या कामांसाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.३६,१६,२४९/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१० सन २०२२-२३ (माहे ऑक्टोबर २०२२ ते माहे सप्टेंबर २०२३) करीता संस्थानचे विविध विभागांसाठी वार्षीक किराणा माल व अनुषंगिक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ (माहे ऑक्टोबर २०२२ ते माहे सप्टेंबर २०२३) करीता संस्थानचे विविध विभागांसाठी वार्षीक किराणा माल व अनुषंगिक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३९,८२,७१,२६३/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-भांडार विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.११ सर्व्हे नं.१२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामांसाठी निविदाधारक विकास कन्स्ट्रक्शन, मुंबई यांची रु.४६,७४,८४६/- मात्रची निम्नतम दराची ई-निविदा माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.३८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व्हे नं.१२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामांसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक विकास कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे निम्नतम दर रक्कम रु.४६,७४,८४६/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१२ संस्थानमार्फत साजरे करणेत येणारा श्री गुरुपोर्णिमा उत्सव सन २०२२ तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणीकामी निविदाधारक न्यु रोशनी मंडप ॲन्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापुर ता.राहुरी यांची निम्नतम निविदा माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.३८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारा श्री गुरुपोर्णिमा उत्सव सन २०२२ तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक न्यु रोशनी मंडप ॲन्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापुर ता.राहुरी यांचे निम्नतम दर रक्कम रु.१५,२०,७८१.७० मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३ श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ मे.वॅट x२) पवनचक्की यंत्रणेचे दि.०१.१२.२०२२ ते ३०.११.२०२३ या कालाधीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेशी वीज विक्रीबाबत करण्यात आलेली कार्यवाही माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.३८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे भोयरे पठार (सुपा) येथे उभारणेत आलेल्या २.५ मेगावॅट (१.२५ मे.वॅट x२) पवनचक्की यंत्रणेचे दि.०१.१२.२०२२ ते ३०.११.२०२३ या कालाधीकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेशी वीज विक्रीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ साई धर्मशाळा, साईआश्रम भक्तनिवास, श्री साई प्रसादालय व साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थानचे मुंबई कार्यालय याठिकाणी LED Board तयार करुन बसविणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील निम्नतम दर माहितीस्तव सादर.

निर्णय क्र.३९० यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा, साईआश्रम भक्तनिवास, श्री साई प्रसादालय व साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थानचे मुंबई कार्यालय याठिकाणी LED Board तयार करुन बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक मे.एएसबी निऑन साईन्स, नवी दिल्ली यांचे निम्नतम दर रक्कम रु.२२,८९,०३२/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचे काम ताबडतोब सुरु करण्यात यावे, अशी सुचना करण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ श्री साईबाबा महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे प्रवेश शुल्क व प्रवेश प्रक्रियेबाबत.

निर्णय क्र.३९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे प्रवेश शुल्क व प्रवेश प्रक्रियेबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यार्थ्यांकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडील परिपत्रक क्र.२२७/२०२१ (संदर्भ क्र.शै.प्रवेश/२९७७) दि.२५.०८.२०२१ संदर्भ क्र.पीजीएस/६७६ दि.२८.०२.२०२० अन्वये कळविण्यात आलेल्या नवीन शुल्क रचनेनुसार तक्ता क्र.१ मध्ये नमुद केलेनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये अनुदानित स्वरुपातील शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली.
२. अनुसुचित जाती-जमाती, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती-जमाती, त्याचबरोबर आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये "तक्ता क्र.२" मध्ये नमुद केलेप्रमाणे शुल्क स्विकारणेस मान्यता देण्यात आली.
३. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची प्रवेश प्रक्रिया मागील वर्षीप्रमाणे वृद्धी सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने राबविणेस व ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने प्रवेश शुल्क स्विकारणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ साईभक्तांना प्रसाद भोजन सुविधा तत्पर पुरविणेसाठी विभागात गेल्या १४ वर्षापासून सेवानिवृत्त, अपंग, आजारग्रस्त तसेच आकृतीबंधानुसार कमी असलेल्या २७२ कर्मचा-यांचे बदली आऊटसोर्सचे दैनंदिन १०० कर्मचारी किमान वेतन दरात कर्तव्यास घेणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालया बरोबरच व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा येथील भोजन व्यवस्था पूर्ण क्षमतेने चालविणे, प्रसादालय विभागाकडे वर्ग करण्यात आलेले ३२ पाणी वाटपाचे कर्मचारी कर्तव्यास घेणे, त्याचप्रमाणे गेल्या १४ वर्षापासून सेवानिवृत्त, मयत झालेल्या तसेच आकृतीबंधानुसार कमी असलेले २७२ कर्मचारी यांचे बदली किमान वेतन दरात दैनंदिन सकाळचे ६ ते २ शिफ्टमध्ये ५० व दुपारच्या २ ते १० या शिफ्टमध्ये ५० याप्रमाणे दैनंदिन एकूण १०० वाढपी कर्मचारी आऊटसोर्स पध्दतीने घेण्यास, याकामी येणा-या अंदाजे वार्षिक रुपये

१,९४,७५,५८८/-+जीएसटी याप्रमाणे खर्चास तसेच या अनुषंगीक पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. उपरोक्त काम हे दैनंदिन व महत्वाचे असल्याने त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१७ श्री उपासणी महाराज मंदिर ते हॉटेल वैशाली पर्यंत रस्ता डांबरीकरण व साईट गटार तयार करण्यासाठी अनुदान दयावयाच्या प्रस्तावाबाबत.

निर्णय क्र.३९३ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

मा.विश्वस्तांनी आयत्या वेळी घेतलेले ठराव

आयत्या वेळेचा विषय नं.१८

ठराव क्र.३९४ मा.राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाचे दि.०१ जून,२०२२ रोजीचे अधिसूचनेनुसार उर्वरीत समिती सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली असुन आता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ अन्वये संपुर्ण समिती अस्तीत्वात आलेली आहे. त्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.३०.११.२०२१ रोजी मा.व्यवस्थापन समितीला घालून दिलेल्या मर्यादा हटविणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, याबाबत विधी विभागाचा अभिप्राय घेऊन त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल. (कार्यवाही- विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१९

ठराव क्र.३९५ सुप्रसिध्द शेफ श्री.संजीव कपुर यांनी संस्थानचे लाडू प्रसाद निर्मिती विभागास भेट देऊन प्रसाद लाडू अधिक चांगला व स्वादिष्ट होण्याचे दृष्टीने काही निर्देश/सुचना दिलेल्या आहेत. सदरचे निर्देश/सुचना लाडू प्रसाद निर्मिती विभागप्रमुख यांनी वरिष्ठांचे निदर्शनास आणून त्याबाबत अंमलबजावणी करण्यात यावी. (कार्यवाही- लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२०

ठराव क्र.३९६ श्रींचे मंदिरातील सेवानिवृत्त पुजारी श्री.बाळासाहेब रा.जोशी यांना सहा महिने कालावधीकरीता विनामोबदला मंदिरात पुजारी म्हणून घेण्यात यावे, अशी सुचना यावेळी करण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२१

ठराव क्र.३९७ मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०५.२०२२ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०६ निर्णय क्र.३११ अन्वये श्री साईंचे दर्शनासाठी येणा-या भक्तांना ०४ नग मोतीचुर लाडू प्रसाद आकर्षक बॉक्स पॅकींगमध्ये तसेच ०१ नग मोतीचुर लाडू प्रसाद रंगीत कागदी पिशवी पॅकींगमध्ये उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी. याप्रसंगी तुपासंदर्भातील निविदा प्रक्रियेची माहिती सभेला सादर करण्यात आली. (कार्यवाही- लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२२

ठराव क्र.३९८ समिती सदस्य मा.श्री.जयवंतराव जाधव यांनी प्रसादालयात वापरले जाणारे पापड सभेमध्ये प्रत्यक्ष दाखवुन ते खराब दर्जाचे असल्याने निदर्शनास आणून दिले. यावर सदरचे पापड निकृष्ठ दर्जाचे असुन यावर तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे, असे सभेचे मत झाले.

मुख्य कार्यकारी अधिकारी याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन सभेस दिले. तसेच वेळ पडल्यास नवीन खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे सांगीतले.

(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२३**

**ठराव क्र.३९९** **खरेदी प्रक्रिया राबवितांना निविदेमध्ये वस्तु/मालाचा गुणवत्ता/दर्जा (Quality) याबाबतचा उल्लेख करण्यात यावा. मागणी नुसार गुणवत्ता/दर्जा (Quality) नसेल तर संबधीत विभागप्रमुख यांनी अहवाल देणे अपेक्षित असुन ही त्यांची जबाबदारी आहे, असे निर्देश देण्यात आले. तसेच असे प्रकार निदर्शनास आल्यास प्रशासनाने कार्यवाही करावी. अशी सुचना करण्यात आली.**

**(कार्यवाही- सर्व विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२४**

**ठराव क्र.४००** **मध्य रेल्वेच्या सोलापुर विभागाने को-ब्रॅन्डींग धोरणांतर्गत कोपरगाव व साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशन साठी expression of interest मागविल्या आहेत. संस्थानला टुरिस्ट फॅसिलिटी सेंटरसाठी जागा मिळाल्यास शिर्डीमध्ये येणा-या साई भक्तांना संस्थानच्या सोई-सुविधेची माहिती प्रदान करता येईल. जे-णे करुन पुन्हा त्या साईभक्तांना शिर्डीमध्ये स्वतंत्रपणे माहिती देण्याची गरज पडणार नाही. व शिर्डीमध्ये या साईभक्तांना देण्यात येणा-या सेवेचा ताण कमी होईल. त्यामुळे सदरचे को-ब्रॅन्डींग धोरणातंर्गत कोपरगांव व साईनगर या रेल्वे स्टेशनसाठी टुरिस्ट फॅसिलिटी सेंटरची लायसेन्स व राईट्स मिळणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.** **(कार्यवाही- जनसंपर्क विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२५**

**ठराव क्र.४०१** **मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२४ जानेवारी,२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१ अन्वये गठीत करणेत आलेल्या उपसमितीमध्ये सदस्य म्हणून शासनाचे दि.०१ जुन, २०२२ रोजीचे अधिसूचनेन्वये नियुक्त करण्यात आलेल्या सर्व समिती सदस्यांचा समावेश करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२६**

**ठराव क्र.४०२** **श्री साई प्रसादालयामध्ये भात तयार केल्यानंतर मिळणा-या पाण्यामध्ये मोठया प्रमाणात पोषक तत्व असतात. त्यामुळे या पाण्याचा योग्य तो वापर करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२७**

**ठराव क्र.४०३** **श्रींची शेजारती होईपर्यंत व्दारकामाई साईभक्तांना दर्शनासाठी उघडी ठेवण्यात यावी.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग/संरक्षण विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२८**

**ठराव क्र.४०४** **संस्थानचे मुंबई कार्यालयाकरीता सन-२००९ चे आकृतीबंधात मंजुर असलेले Officer On Special Duty हे पद भरणेबाबत कार्यवाही ताबडतोब करण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२९**

**ठराव क्र.४०५** **श्री साईबाबा संस्थान एम्प्लाईज क्रेडीट को.ऑप. सोसा. लि.शिर्डी यांना व्यवसायासाठी वापरास दिलेल्या संस्थान मालकीचे गाळे/जागा यांची पाहणी करुन त्या ठिकाणी करारनाम्यामध्ये नमुद व्यवसायाऐवजी दुसरा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आल्यास असे व्यवसाय बंद करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३०**

**ठराव क्र.४०६** श्रींचे मंदिरातील आरत्या तालासुरात ऐकु येत नाहीत, याकरीता तेथील यंत्रणा दुरुस्त करुन घेण्यात यावी. तसेच मंदिर परिसर, दर्शनरांग, भक्तनिवासस्थान, प्रसादालय येथे आवश्यकतेनुसार छोटे स्पिकर लावण्यात यावेत. (कार्यवाही- ध्वनिक्षेपन विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३१**

**ठराव क्र.४०७** संस्थानचे दैनंदिन लेखाविषयक कामकाजामध्ये सुसुत्रता यावी याकरीता एकत्रित मानधनावर C.A. नियुक्त करणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मागणी केली. त्यास मान्यता देण्यात येऊन याबाबत ताबडतोब कार्यवाही करावी, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/लेखाशाखा विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३२**

**ठराव क्र.४०८** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजना तातडीने सुरु करणेकामी आवश्यक असणारे संगणके व संगणक साहित्य तातडीने खरेदी करणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अधिकारात कार्यवाही करावी. (कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३३**

**ठराव क्र.४०९** मुख्य कार्यकारी अधिकारी सभेस सांगीतले की, संस्थानचे शैक्षणिक संकुलाचा दर्जा व गुणवत्ता यामध्ये आणखी चांगली सुधारणा होणेसाठी मा.व्यवस्थापन समिती सदस्यांनी संस्थानचे अधिकारी व शाळेचे शिक्षक यांना सोबत घेऊन ठिकठिकाणच्या शाळांना भेटी देऊन तेथील विविध उपक्रमांची माहिती घ्यावी. याकामी समिती सदस्य मा.श्री.अविनाश दंडवते, मा.श्री.सचिन गुजर, मा.श्री.महेंद्र शेळके, मा.श्री.सुनिल शेळके व मा.श्री.सचीन कोते यांची नावे निश्चीत करण्यात आली.

(कार्यवाही- शैक्षणिक संकुल)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३४**

**ठराव क्र.४१०** संस्थानमधील काही कर्मचारी संस्थानची पुर्वपरवानगी न घेता समाज प्रसार माध्यमाव्दारे संस्थानचे कामकाजासंदर्भात वृत्त प्रसिध्द करुन त्यामध्ये आपले मत/अभिप्राय नमुद करतात, त्यामुळे संस्थानची प्रतिमा मलिन होते. तसेच राजकीय पक्षाचे प्रतिनिधीमार्फत संस्थानचे कामकाजात हस्तक्षेप करत असल्याचे निदर्शनास आले आहे. याकरीता शासन निर्णय क्र.सासंवि-२०१२ प्र.क्र.१९/ पुनर्बांधणी-७/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.२८ ऑक्टोंबर, २०१३ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या ‘श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम,२०१३’ मधील कलम ४ ‘राजकारण आणि निवडणूका या मधील सहभाग’ पोटकलम (१)(२)(३)(४) मध्ये नमुद बाबींचे संस्थान कर्मचा-यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, या नियमाचे उल्लंघन केल्यास गंभीर स्वरुपाचे कृत्य समजण्यात येईल. याबाबत परिपत्रक काढून सर्व कर्मचा-यांना सुचना देण्यात याव्यात. सदरचा ठराव सर्वसंमतीने मान्य करण्यात आला. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३५**

**ठराव क्र.४११** कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे साई भक्तांचे गर्दीवर निर्बंध असल्याने तसचे छपाई होऊन पुरवठा होणेस काहीसा कालावधी लागल्याने सन-२०२२ मधील श्री साईबाबा दैनंदिनी (मोठी व पॉकेटसाईज) तसेच विविध ९ प्रकारच्या दिनदर्शिका या प्रकाशित साहित्यांची अपेक्षित विक्री न झाल्याने शिल्लक असलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिका यांची श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०२२ पासून सवलतीच्या दरात विक्री करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३६**

**ठराव क्र.४१२** **वैद्यकीय महाविद्यालय व नर्सिंग कॉलेज हे संस्थान मालकीचे मौजे रुई येथील गट नं.२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर येथे प्रस्तावित करणेबाबत तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेतलेला असून त्यानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी मा.शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे.**

**परंतु श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल हे शिर्डी येथे अनेक वर्षापासून सुरु असुन हॉस्पिटल लगत संस्थान मालकीची सर्व्हे नं.१२४,१२५ व १२६ मधील क्षेत्र ३१ आर उपलब्ध आहे. सदरची जागा ही 'रुग्णालय विस्तारीकरण' यासाठी आरक्षीत असुन संस्थान प्रशासन, दळणवळण, कर्मचारी निवासस्थान या सर्व बाबींच्या दृष्टीने सोईयुक्त आहे.**

**या सर्व बाबींचा विचार करता नविन होणारे १००० खाटांचे रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय व नर्सिंग कॉलेज हे एकाच ठिकाणी सर्व सोईयुक्त होणेकामी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४,१२५ व १२६ या क्षेत्रात प्रस्तावित करुन त्यानुसार सुधारीत प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, याबाबत विधी विभागाचा अभिप्राय घेऊन कार्यवाही करता येईल.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/मालमत्ता विभाग )**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३७**

**ठराव क्र.४१३** **श्री साईबाबा संस्थानमध्ये कायम कर्मचारी संख्या अतिशय कमी झाली असून, महत्वाचे पदावर प्रभारी म्हणून कर्मचारी अनेक वर्षापासून काम करीत आहेत. त्याचा परिणाम म्हणून संस्थानचे दैनंदिन व नविन कामात तसेच मा.व्यवस्थापन समितीने घेतलेले निर्णय कार्यान्वीत होण्यास विलंब होत आहे. यासाठी शासनाचे आदेशाप्रमाणे नियमांचे पालन करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.**

**याकरीता कामगारांना स्थैर्य मिळणेचे उद्देशाने व श्री साईबाबा संस्थानचे काम सुकर होणेसाठी एकत्रित मानधनावर कामगारांना सेवेत घेणेकरीता कार्यवाही करण्यात यावी.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, याबाबत विधी विभागाचा अभिप्राय घेऊन कार्यवाही करता येईल.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**वरील निर्णय/ठराव क्र.३५३ ते ४१३ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ८.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत /- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (ना.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**